**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला – मा. रामदास माने

दि. ३० जानेवारी २०२५

प्रभात

Gramin_01 Feb 2025_005
01 Feb 2025

## आयुष्यात अनेक अडचणी येतात पण... - रामदास माने

**राजगुरूनगर, दि. ३१ (प्रतिनिधी)** - आयुष्यात अनेक अडचणी येतात; परंतु तुमच्याकडे जिद्द, चिकाटी, संयम, निर्णय घेण्याची क्षमता, प्रसंगावधान, श्रमावर निष्ठा, कृतज्ञता भाव, उत्तम संभाषण कौशल्य, विवेक हे सर्व गुण सोबत असतील तर कोणत्याही क्षेत्रात आपण यशस्वी होऊ शकतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध उद्योजक, थर्माकोल मॅन रामदास माने यांनी केले.

राजगुरूग्गर येथे आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत १कसा घडतो उद्योजक या विषयावर माने बोलत होते. माने म्हणाले की, सरकारी नोकर्‍या राहिल्या नाहीत. त्यामुळे नोकर्‍या मागणारे नको तर नोकर्‍या देणारे व्हा. विद्यार्थ्यांनी नवकल्पना राबवाव्यात. सुविधा, भांडवल, जागा नाही याचा बाऊ करू नये. सकारात्मकपणे लढत राहणे आवश्यक आहे. व्यवसाय, उद्योग या क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर क्षमता सिद्ध करावी लागते. धोका पत्करावा लागेल. यश मिळाले तरी डोके शांत ठेवलेच पाहिजे. अपशय पदरी आले तरी निराशेला बळी पडायचे नाकारले पाहिजे. पुन्हा प्रयत्न केला पाहिले. प्रगतीचा मार्ग हा असाच असतो. यशापर्यंत पोहोचायला हा एकच राजमार्ग आहे, असे ते म्हणाले.

## ‘जिद्द, चिकाटी असल्यास यश निश्चित मिळेल’

**खेड :** आयुष्यात अनेक अडचणी येतात; परंतु जिद्द, चिकाटी, संयम, निर्णयक्षमता, प्रसंगावधान, श्रमावर निष्ठा, कृतज्ञता भाव, उत्तम संभाषणकौशल्य, विवेक हे सर्व गुण सोबत असतील तर कोणत्याही क्षेत्रात आपण यशस्वी होऊ शकतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध उद्योजक थर्माकोलमॅन रामदास माने यांनी केले. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत ‘कसा घडतो उद्योजक’ या विषयावर ते बोलत होते. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, ॲड. सर्जेराव पानसरे, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. माने पुढे म्हणाले, सरकारी नोकऱ्या राहिल्या नाहीत. त्यामुळे नोकऱ्या मागणारे नको, तर नोकऱ्या देणारे व्हा. विद्यार्थ्यांनी नवकल्पना राबवाव्यात. सुविधा, भांडवल, जागा नाही, याचा बाऊ करू नये. सकारात्मकपणे लढत राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, हे महाविद्यालय उद्योगपतींची शाळा व्हावी. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक उद्योजक व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. रामदास माने यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून रोजगार हमीचा मजूर ते यशस्वी उद्योजक, हा प्रवास खुमासदार शैलीत उलगडून दाखविला. सूत्रसंचालन डॉ. कैलास सोनवणे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. पायल ओसवाल यांनी करून दिला. सोनाली वाटेकरी हिने आभार मानले.

My Gramin Edition
Feb 01, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

# जिद्द, चिकाटी असेल तर यश नक्की : माने

समर्थ भारत वृत्तसेवा



**राजगुरूनगर ता. ३१ :** आयुष्यात अनेक अडचणी येतात परंतु तुमच्याकडे जिद्द, चिकाटी, संयम, निर्णय घेण्याची क्षमता, प्रसंगावधान, श्रमावर निष्ठा, कृतज्ञता भाव, उत्तम संभाषण कौशल्य, विवेक हे सर्व गुण सोबत असतील तर कोणत्याही क्षेत्रात आपण यशस्वी होऊ शकतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध उद्योजक, थर्माकोल मॅन रामदास माने यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'कसा घडतो उद्योजक' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, अॅड. राजमाला बुट्टेपाटील, अॅड. सर्जेराव पानसरे, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ. एच.एम.जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

रामदास माने बोलताना पुढे म्हणाले की सरकारी नोकऱ्या राहिल्या नाहीत. त्यामुळे नोकऱ्या मागणारे नको तर नोकऱ्या देणारे व्हा. विद्यार्थ्यांनी नवकल्पना राबवाव्यात. सुविधा, भांडवल, जागा नाही याचा बाऊ करू नये. सकारात्मकपणे लढत राहणे आवश्यक आहे. व्यवसाय, उद्योग ह्या क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर क्षमता सिद्ध करावी लागते. धोका पत्करावा लागेल. यश मिळाले तरी डोके शांत ठेवलेच पाहिजे. अपशय पदरी आले तरी निराशेला बळी पडायचे नाकारले पाहिजे. पुन्हा प्रयत्न केला पाहिले. प्रगतीचा मार्ग हा असाच असतो. यशापर्यंत पोहोचायला हा एकच राजमार्ग आहे, असे ते म्हणाले.

हे महाविद्यालय उद्योगपतींची शाळा व्हावी. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक उद्योजक व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. रामदास माने यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून रोजगार हमीचा मजूर ते यशस्वी उद्योजक हा प्रवास खुमासदार शैलीत उलगडून दाखवला. सूत्रसंचालन डॉ. कैलास सोनवणे यांनी केले, परिचय डॉ. पायल ओसवाल यांनी दिला तर आभार सोनाली वाटेकरी हिने मानले.



राजगुरुनगर येथील व्याख्यानमालेत बोलताना उद्योजक रामदास माने

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**